


# हॅलो प्रभात

नवे विचार...नवी सुरुवात

RNI NO. MAHMAR/2020/79996

▪ मुख्य संपादक : गणेश पाटील (सावर्डेकर)

▪ मुंबई ▪ पुणे ▪ सांगली ▪ कोल्हापूर ▪ सातारा ▪ सोलापूर ▪ अहिल्यानगर

सांगली-कोल्हापूर ▪ वर्ष : ०६ ▪ अंक : २३० ▪ सोमवार, २४ नोव्हेंबर २०२५ ▪ किंमत : ३ रुपये ▪ पाने : ४








**भाड्याने देणे**

**इंडोशिवा ॲसेट**

**विश्रामबाग**

**गणपती मंदिरासमोर**

छोटे ऑफिस, आर्किटेक्चर, सी.ए., वकील, संस्था, लॅब इ. साठी उपयुक्त अशी २५० स्के.फू. ऑफिससाठी भाड्याने देणे आहे.

संपर्क

7517219001

9011889001


# काँग्रेस नेत्यांमधील 'दे धडक' कुठाय?

## वसंतदादांच्या जिल्ह्यात काँग्रेस तीन तालुक्यांतच!

**सांगली : हॅलो प्रभात**

'स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीत काँग्रेस नेत्यांमधील 'दे धडक' ची वृत्तीच संपल्याचे जाणवत आहे. शिराळा, ईश्वरपूर, आष्टा, तासगाव, आटपाडी आणि विटा या ठिकाणी काँग्रेसने 'भाजप विरोधासाठी तडजोड' नावाखाली शरणागती पत्करली आहे. पलूस आणि जतमध्ये मात्र काँग्रेस पूर्ण ताकदीने लढताना दिसत असली तरी अन्यत्र काय? याची चर्चा काँग्रेस पदाधिकाऱ्यांमधूनच केली जात आहे. आगामी महापालिका, जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये याचा मोठा परिणाम होईल असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

सांगली जिल्हा एकेकाळचा काँग्रेसचा बालेकिल्ला होता. वसंतदादा पाटील, राजारामबापू पाटील यांनी सांगलीत काँग्रेसला सोन्याचे दिवस दाखवले, पण याच जिल्ह्यातून नगरपरिषद, पंचायत समिती निवडणुकीत काँग्रेसचा 'हात' च गायब झाल्याचे राजकीय जाणकारांमधून बोलले जात आहे.

राष्ट्रवादीच्या स्थापनेनंतर जिल्ह्यातील कारखानदार आणि संस्थानिकांनी हातावर घड्याळ बांधले. त्यामुळे पंजाचे पतन सुरु झाले. प्रतिक पाटील यांचा लोकसभेला पराभव झाल्यानंतर सांगली, मिरज शहरातूनही काँग्रेस गायब झाली.

काही काळ विशाल पाटील यांनी जिल्ह्यात काँग्रेसचे नेतृत्व केले, पण २०१९ मध्ये त्यांनी आधी स्वाभिमानी आणि नंतर अपक्ष निवडणूक लढवली. आता जिल्ह्यातील बहुतांश नेते भाजपमध्ये गेले आहेत. आता तर फक्त आ. डॉ. विश्वजीत कदम हेच एकमेव काँग्रेस आमदार राहिले आहेत, तर जतमध्ये जिल्हाध्यक्ष विक्रम सावंत यांच्या नेतृत्वात काँग्रेसमध्ये धुगधुगी राहिली आहे. जिल्ह्यात ६ नगरपालिका आणि २ नगरपंचायतींची निवडणूक रणधुमाळी सुरूआहे.

यापैकी ६ ठिकाणी काँग्रेसने शरणागती पत्करली आहे. या सहाही ठिकाणांहून 'हात' चिन्ह गायब आहे. फक्त पलूस आणि जत नगरपालिकेत काँग्रेस लढत आहे.

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका लागण्यापुर्वी, आणि लागल्यानंतर काँग्रेसच्या अनेक मातब्बर नेत्यांनी 'कमळ' हातात घेतले. त्यात माजी आमदार सदाशिवराव पाटील, आमदार सत्यजित देशमुख ही प्रमुख नावे आहेत. परिणामी, अनेक ठिकाणी काँग्रेसची अवस्था बिकट आहे. त्याचा परिणाम, नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकीत दिसू लागला आहे.

विटा पालिका क्षेत्रात कार्यकर्त्यांची फरफट होत राहिली आहे. विटा नगरपालिका हा काँग्रेसचा गड होता. माजी आमदार सदाशिवराव पाटील यांनी पक्षांतर केले आणि पुन्हा तेथे काँग्रेसला प्रबळ नेतृत्व उभे करता आले नाही. खानापूर तालुक्याच्या ग्रामीण भागात आमदार डॉ. विश्वजित कदम, माजी आमदार मोहनराव कदम यांना मानणारा गट आजही आहे.

काँग्रेस नेत्यांनी विट्यामध्ये भाजपच्या विरोधात शिवसेनेला मोकळे रान दिले आहे. तीच अवस्था आटपाडीत आहे. येथे काँग्रेस औषधाला तरी सापडेल का? असा शोध घ्यावा लागतो.

आमदार जयंतराव पाटील, आमदार विश्वजित कदम आणि खासदार विशाल पाटील यांच्यात 'हात' विरुद्ध 'तुतारी' अशी लढत करायची नाही, असा करार झाल्यामुळे ईश्वरपूर नगरपरिषदेतून काँग्रेस बाहेर आहे . कार्यकर्ती ए-बी फॉर्म द्या, आम्ही लढतो, असे सांगत असताना तिथे काँग्रेसने ताकद दिली नाही.

शिराळ्यात काँग्रेसची अवस्था फारशी चांगली राहिलेली नाही. या ठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट एकत्र आले आहेत. मात्र, काँग्रेस कुठेच दिसत नाही. तेथे काँग्रेसच्या चिन्हावर भविष्यात कधी निवडणूक लढली जाईल, याबद्दल सांगणे कठीण आहे, तशीच अवस्था तासगावमध्यदेखील झाली आहे.

जतमध्ये माजी आमदार, जिल्हाध्यक्ष विक्रम सावंत पूर्ण ताकदीने लढताना दिसत आहेत. जिल्ह्याचे काँग्रेस नेते आ. डॉ. विश्वजित कदम यांनी पलूसमध्ये चांगली व्यूहरचना केली आहे.

दोन्ही ठिकाणी काँग्रेस सत्तेचा दावा करत आहे, अन्यत्र मात्र काँग्रेसची अवस्था खूपच बिकट आहे. वसंतदादा पाटील यांच्या जिल्ह्यात काँग्रेस तीन तालुक्यांपुरतीच उरेल, असेही राजकीय जाणकारांमधून बोलले जात आहे.

# शहराच्या कानाकोपऱ्यात घड्याळाची टीकटीक

## विरोधकांचे बारा वाजणार, प्रचार शिगेला

**दौंड : हॅलो प्रभात**

दौंड नगराध्यक्षपदाचा प्रचार चुरशीला आला असून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, शिवसेना उबाठा आणि मित्र पक्षांच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार दुर्गादेवी इंद्रजित जगदाळे पाटील यांच्यासह नगरसेवक पदाच्या उमेदवारांच्या प्रचार मोहिमेला वेग दिला आहे.

दौंड शहरात गल्ली बोळात जाऊन घराघरात मतदारांचा संपर्क साधला. मतदारांनी प्रभागातील विविध प्रश्न मांडत उमेदवारांशी संवाद साधला.



यावेळी प्रभागातील नगराध्यक्ष पदाचे उमेदवार तसेच नगरसेवक पदाचे उमेदवार यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस व मित्रपक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रचार मोहीमे दरम्यान उमेदवारांनी प्रभागातील मूलभूत सुविधांवर विशेष भर देत विकासनिष्ट कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला.

दुसरीकडे अजितदादांच्या राष्ट्रवादी उमेदवारांच्या विजयासाठी सर्वस्तरातून उत्स्फूर्त प्रतिसाद एकीकडे दिसून येत असतानाच

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाच्या प्रचार यंत्रणा दिवसाची रात्र करत दुर्गादेवी जगदाळेंच्या विजयासाठी काम करत आहे.

यावेळी प्रभागातील नगरसेवक पदाचे उमेदवार राणी लष्करे, विकास लोंढे, तालिब शेख आणि भाग्यश्री पळसे उपस्थित होते.

# सुनीता गढळे समाज रत्न पुरस्काराने सन्मानीत

## अमरापूर ग्रामस्थांच्या वतीने सत्कार

**कडेगाव : हॅलो प्रभात**



अमरापूर (ता.कडेगाव) येथील ग्रामपंचायतच्या लोकनियुक्त सरपंच सुनिता गढळे यांना एक सर्वसामान्य कुटुंबातूनअसून अमरापुर सारख्या छोट्या गावाचे प्रथम नागरिक म्हणून नियोजनबद्ध कारभार केल्याबद्दल एम.डी. फाउंडेशन महाराष्ट्र राज्य आयोजित महाराष्ट्र नारीशक्ती समाज रत्न पुरस्कार २०२५ ने सन्मानित करण्यात आले.

त्याबद्दल अमरापुर गावच्या लोकनियुक्त सरपंच सुनीता प्रकाश गढळे यांनचा अमरापूरचे उपसरपंच महादेव रुपनर, ग्रामपंचायत सदस्य मच्छिंद्र मोरे, शुभांगी पवार, वंदना शिंगटे, शुभांगी आंबवडे, ग्रामपंचायत अधिकारी एस के चव्हाण यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला

# ना.शंभूराज देसाई यांच्या प्रयत्नातून ३४ कोटीचा निधी मंजूर

**सातारा : सूर्यकांत पाटणकर**

पाटण विधानसभा मतदारसंघातील अंतर्गत रस्ते, चावडी इमारती, ओढयावरील साकव, नवीन अंगणवाडी इमारती, शाळा खोली, को.प.बंधारे,

वळण बंधारे, मंदिर सुशोभिकरण, इतर जिल्हा मार्ग दुरुस्ती, शासकीय इमारतींचे बांधकाम व नूतनीकरण इ.



कामांसाठी ना.शंभूराज देसाई यांनी सन २०२५-२६ च्या जिल्हा वार्षिक आराखडयाम धून निधी मंजूर होण्यासाठी शिफारशी केल्या होत्या.

त्यानुसार स्थानिक विकास निधी व जिल्हा वार्षिक आराखडयातून ३४ कोटी ५५ हजार रुपयांचा निधी मंजूर झाला असल्याची माहिती ना.शंभूराज देसाई यांचे कार्यालयाचेवतीने प्रसिध्दीपत्रकांत देण्यात आली आहे.

# 'मोडनिंब'मध्ये स्वामी समर्थांची शोभायात्रा

## कलशासह महिलांचा भक्तिभरलेला सहभाग

**मोडनिंब : संतोष पांढरे**

विद्यानगरी (शिवाजी नगर) येथे दि. २६ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या 'अक्कलकोट निवासी राजाधिराज, योगीराज श्री स्वामी समर्थ महाराज' यांच्या मंदिरातील मूर्तीचा प्राणप्रतिष्ठा सोहळ्यापूर्वी, दि.२३ नोव्हेंबर रोजी मोडनिंब शहरभर भव्य शोभायात्रा निघाली होती.आकर्षक रथात श्री स्वामी समर्थांची मूर्ती जणू काही जिवंत



मूर्ती विराजमान, घोड्यांच्या अलंकारिक रथावर छत्र, फुलमाळा व सुवर्णरंगाच्या सजावटीमुळे संपूर्ण शहर भक्तीमय झाले.

कलशधारी महिलांचा पिवळ्या काठापदराच्या साड्यांतून उमटलेला भक्तीभाव यात्रेला खास ओळख देत होता.

ढोल-ताशांच्या गजरात, भगवे पताके वाऱ्यावर झेपावत, स्वामीनामाचा गजर चारही दिशांना पसरत रथ हळूच पुढे सरकत होता.

यात्रेत सहभागी झालेल्यांच्या डोळ्यांत भावनांचे पाणी तरळले शहरात दोन ते अडीच तास भक्तिभावात न्हालेली ही यात्रा पुन्हा विद्यानगरीत परतली. त्यानंतर स्नेहपूर्वक आयोजित अल्पोपहाराने कार्यक्रमाचा भावपूर्ण समारोप झाला.

विद्यानगरी सोसायटीच्या अध्यक्ष आणि सर्व सभासदांकडून तसेच सर्व सहकार्या कडून दि.२६ रोजी बुधवारी प्राण प्रतिष्ठापना सोहळ्यास स्वामी भक्तांनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. मोडनिंबवासीयांच्या हृदयात ही रथयात्रा दीर्घकाळ दिव्य स्मृती म्हणून उजळत राहणार आहे.

# एकोपा राखण्याचे काम संजयकाकांनी केले

## सुजात आंबेडकर ; वंचित बहुजन व स्वाभिमानी विकास आघाडीच्या उमेदवारांना निवडून द्या

**तासगाव : हॅलो प्रभात**

लोकसभा आणि विधानसभा निवडणूक या महत्त्वाच्या निवडणुका असतात पण या वरच्या लोकांच्या निवडणुका असतात. आपल्याला काम करणारी लोक हवेत. आपल्यावर संकट आल्यास आपल्या सोबत उभी असणारी लोक हवीत. नागरिकांचे दैनंदिन प्रश्न सोडवणाऱ्या व्यक्तीची ही निवडणूक असते म्हणून नगरसेवक पदाची निवडणूक महत्त्वाची आहे. संजयकाका पाटील यांच्या नेतृत्वाखालील वंचित बहुजन आघाडी व स्वाभिमानी विकास आघाडीच्या उमेदवारांना निवडून द्या, अशी हाक सुजात आंबेडकर यांनी तासगावकर जनतेला दिली. नगरपरिषद निवडणूक जाहीर प्रचार सभेमध्ये ते बोलत होते.

यावेळी वंचित बहुजन आघाडीचे सोमनाथ साळुंखे, माजी खासदार संजयकाका पाटील, प्रभाकर पाटील, वंचित बहुजन आघाडी व स्वाभिमानी विकास आघाडी कडून




नगराध्यक्षपदाच्या उमेदवार विजया बाबासो पाटील तसेच नगरसेवक पदाचे सर्व उमेदवार उपस्थित होते.

सुजात आंबेडकर पुढे म्हणाले, वंचित बहुजन आघाडी आणि स्वाभिमानी विकास आघाडीने खुले आरक्षण असताना बौद्ध व कासार समाजातील उमेदवार उभे केले. याबाबत कोणीही आक्षेप घेतला नाही. यामधे जातीय एकोपा दिसून येतो आणि हा एकोपा राखण्याचे काम संजयकाका पाटील यांनी केले आहे. नगरसेवक पदाची निवडणूक ही नागरिकांसाठी महत्त्वाची निवडणूक आहे. आपल्याला मदत मदत करणाऱ्या व्यक्तीची ही निवडणूक म्हणून ही महत्त्वाची आहे. रस्ते, वीज, पाणी आणि दैनंदिन सोई सुविधा देणाऱ्या उमेदवाराला आपण मत द्यायला हवं. लोकांसाठी धावून येणाऱ्या वंचित बहुजन आघाडी व स्वाभिमानी विकास आघाडी च्या उमेदवारांना निवडून द्या असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी संजयकाका पाटील म्हणाले, प्रतिकूल परिस्थितीमध्ये, संघर्षाच्या परिस्थितीमध्ये तासगाव शहराने मला साथ दिली. दोन ते तीन टर्म नगरपरिषदेची सत्ता आपल्याकडे सोपवली. सरकारच्या माध्यमातून निधी आणून प्रामाणिकपणे विकास कामे करण्याचा प्रयत्न केला. शहरातून जाणाऱ्या विटा म्हैशाळ रस्त्याचे लवकरच टेंडर निघून कामकाजास सुरुवात होईल. तालुक्यात डिजिटल बोर्ड बाजीतून होणाऱ्या श्रेयवादाच्या पलीकडे जाऊन तालुक्यातील शेतकरी जनता अडचणीत आहेत त्यांना कर्जमाफीचे दिलेलं आश्वासन सरकारकडून लवकर पूर्ण करावं यासाठी आग्रह धरला. अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांवर संकट आल आहे. पैसे वाल्यांची निवडणूक झाली असताना नगरसेवक पदासाठी आम्ही सेंट्रींग करणाऱ्या व्यक्तीला संधी दिली. स्वाभिमानी विकास आघाडीचे उमेदवार पहिले तर जे समाजासाठी काही करू इच्छितात त्या सगळ्यांना संधी देण्याचं काम केलं आहे. उमेदवार पहा, कोण कामाचे आहेत, कोणाचे काय धंदे आहेत हे सगळं ओळखा असा टोला त्यांनी नाव न घेता विरोधकांना लगावला. शहराच्या विकासासाठी वंचित बहुजन आघाडी व स्वाभिमानी विकास आघाडीच्या नगराध्यक्ष व नगरसेवक पदाच्या सर्व उमेदवारांना निवडून द्या असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी बोलताना नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार विजया पाटील म्हणाल्या, संजयकाका पाटील यांच्या नेतृत्वाखाली विविध विकास कामे करून तासगाव नगरपालिकेचा चेहरा मोहरा बदलण्याचे काम गेल्या दहा वर्षात सुरू आहे. तासगावातील छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा अनावरण कार्यक्रम एकत्र घेऊन सामाजिक सलोखा आणि एकात्मतेचा संदेश काकांनी दिला. शहराचा सर्वांगीण विकास करण्याच व्रत आम्ही सर्व उमेदवार घेत आहोत. आपली सेवा करण्याची संधी देण्याची मागणी आम्ही करत आहोत. असे विजया पाटील म्हणाल्या.

## संक्षिप्त...

### टीईटी पेपर फुटीचा कट उधळला

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

संपूर्ण राज्यभरात शिक्षक पात्रता परीक्षा सुरू झाल्या. या परीक्षेचा पेपर फोडण्याच्या तयारीत असलेल्या एका टोळीचा पर्दाफाश मुरगूड पोलिसांनी स्थानिक गुन्हे अन्वेषणच्या पथकाद्वारे केला आहे. या प्रकरणी नऊजणांना ताब्यात घेण्यात आले आहे. सदरच्या टोळीची व्याप्ती फार मोठी असण्याची शक्यता असून, मुरगूड पोलीस या घटनेचा अधिक तपास करत आहेत.

### सोलापुरात तापमानात ३.६ अंशानी वाढ

**सोलापूर : हॅलो प्रभात**

गेल्या तीन दिवसांत किमान तापमानात ३.६ अंश सेल्सिअसने वाढ झाल्याने थंडी गायब झाली असून, दुपारी सोलापूर शहर परिसरात ढगाळ वातावरण निर्माण झाले होते. त्यामुळे थंडीपासून नागरिकांना दिलासा मिळाला आहे. पुढील आठवडाभर वातावरण ढगाळ राहणार असून, किमान तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे.

### ग्रामपंचायत अधिकाऱ्यांचे असहकार आंदोलन

**सोलापूर : हॅलो प्रभात**

प्रशासनाच्या जाचाला कंटाळून ग्रामपंचायत अधिकाऱ्याने गळफास लावून घेऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची चौकशी करून दोषींवर गुन्हा दाखल करावा, या मागणीसाठी सोलापूर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील ग्राम पंचायत अधिकाऱ्यांनी संबंधित पंचायत समितीच्या गट विकास अधिकाऱ्यांना निवेदन दिले. जिल्ह्यात प्रशासनाबरोबर असहकार आंदोलन सुरू करण्यात आले आहे.

### कवठेमहांकाळ येथे मंगळवारी पदयात्रा

**सांगली : हॅलो प्रभात**

सरदार वल्लभभाई पटेल यांची १५० वी जयंती वर्ष म्हणून साजरे केले जात आहे, या ऐतिहासिक प्रसंगाचे औचित्य साधून राष्ट्रीय एकता दिनानिमित्त ३१ ऑक्टोबर ते २५ नोव्हेंबर २०२५ दरम्यान संपूर्ण भारतभर जिल्हास्तरीय पदयात्रा आयोजित केल्या जात आहेत. या अंतर्गत जिल्हास्तरीय दुसरी युनिटी मार्च /पदयात्रा दि.२५ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ८ वाजता होणार असून पदयात्रेची सुरवात बाळासाहेब गुरव हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज कवठेमहांकाळ येथून होणार आहे.




## पक्षातील अस्वस्थ नेते

ज्या शिलेदारांना सोबत घेत एकनाथ शिंदे यांनी ठाकरेंच्या शिवसेनेला जय महाराष्ट्र करत जबर धक्का दिला, तेच शिलेदार आता एकनाथ शिंदे यांच्यासाठी घातक ठरतायत की काय, अशी भीती राजकीय वतुर्ळात व्यक्त केली जात आहे. आधीच भाजपकडून एकनाथ शिंदे यांची कोंडी होत असतानाच आता विश्वासू शिलेदारच शिंदे यांच्या विरोधात बंड पुकारणार, अशी राजकीयदृष्ट्या अगदी नाजूक परिस्थिती शिवसेनेत निर्माण झाली आहे. भाजपबरोबर दोन हात करत असतानाच, त्यात पक्षांतर्गत संघर्ष वाढीस लागल्यामुळे सध्याच्या घडीला एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत अस्वस्थता निर्माण झाली आहे. जून २०२२ मध्ये एकनाथ शिंदे यांनी शिवसेना बाळासाहेब उद्धव ठाकरे यांच्या पक्षाला जय महाराष्ट्र केला आणि भाजपशी जवळीक साधली. ठाकरेंच्या शिवसेनेला जय महाराष्ट्र करणे, भाजपशी हातमिळवणी करणे यामागे अनेक कारणे सांगितली जात आहेत. शिंदे यांनी उद्धव ठाकरेंना जबर धक्का दिला आणि देशातील राजकारणात शक्तिशाली भूकंप झाला. या भूकंपाचा केंद्रबिंदू अर्थातच महाराष्ट्र होता. सध्या मंत्रिपदे, संस्थांच्या नियुक्त्या, महत्त्वाच्या जबाबदाऱ्या यांमध्ये अनेक जणांना अपेक्षित स्थान न मिळाल्याने नाराजी वाढत आहे. त्यात स्थानिक पातळीवर भाजप आपली संघटना अधिक मजबूत करत आहे. अशा परिस्थितीत शिवसेना शिंदे गटातील आमदारांना स्वतःची जागा टिकवण्यासाठी भाजपकडे झुकावे लागत आहे. त्यात ठाकरेंच्या शिवसेनेशी सुरू असलेला संघर्ष, भाजपबरोबरील शीतयुद्धामुळे शिंदेंच्या शिवसेनेला सावध भूमिका घ्यावी लागत आहे. त्यामुळे एकनाथ शिंदे यांच्यासाठी सध्याचे आव्हान म्हणजे अंतर्गत विरोध शमवणे, कार्यकर्त्यांशी संवाद, संघटनात्मक सुधारणा आणि स्वतंत्र ओळख मजबूत करणे हे आगामी काळात त्यांच्या नेतृत्वाची खरी परीक्षा ठरणार आहे. कारण सत्ता मिळवणे जितके कठीण तितकेच ती टिकवण्यासाठी पक्षातील ऐक्य आवश्यक आहे आणि तेच आज शिंदे यांच्या शिवसेनेत सर्वाधिक डळमळीत झालेले दिसून येते. महाराष्ट्रातील सत्तेचा राजकीय पट सतत बदलत असताना महायुतीतील तीन प्रमुख घटक – एकनाथ शिंदे यांची शिवसेना, भारतीय जनता पक्ष आणि अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस – यांच्यातील नातेसंबंध दिवसेंदिवस गुंतागुंतीचे होत आहेत. एकत्रितपणे सत्ता उपभोगत असताना सार्वजनिकरीत्या उमटणारे वाद, टोला–टिप्पण्या आणि परस्परांवरील नाराजी, विशेषतः शिवसेनेत वाढत चाललेली अस्वस्थता, हे आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अत्यंत चिंताजनक आहे. भाजपच्या नेत्यांकडून झालेली प्रसंगी टीका, महत्त्वाच्या निर्णयांत शिवसेनेची मागे पडलेली भूमिका, तसेच मंत्रिमंडळात अपेक्षित तितकी प्रतिष्ठा न मिळाल्याच्या चर्चा, यामुळे शिवसेनेतील खासदार–आमदारांमध्ये अस्वस्थता वाढली आहे. सत्तेत आहोत, पण निर्णय कुठे आपल्या हातात आहेत?असा सूर आळवला जात आहे. महायुतीतल्या या अंतर्गत संघर्षाची सार्वजनिक झलक नुकत्याच झालेल्या सभांमध्येही दिसली, जिथे शिवसेना आणि भाजप नेत्यांत टोलेबाजी उफाळून आली. त्यात शिवसेनेचे अनेक नेते भाजपशी जवळीक साधून आहेत. त्यामुळे ठाकरेंच्या शिवसेनेला जय महाराष्ट्र करत स्वतःची शिवसेना स्थापन करणाऱ्या एकनाथ शिंदे यांना आता आपलेच शिलेदार नवी खेळी खेळतील आणि शिवसेना एकाकी पडेल, अशी भीती सतावणे स्वाभाविक आहे. महायुतीतील तणाव लगेच वाढणार नाही, पण तो वाढत गेला तर आगामी निवडणुकीत त्याची मोठी राजकीय किंमत महायुतीला मोजावी लागू शकते. सत्तेची एकजूट टिकवण्यासाठी परस्परांतील मतभेद सोडवणे, निर्णय प्रक्रियेत पारदर्शकता ठेवणे आणि सर्व घटक पक्षांना समान प्रतिष्ठा देणे आवश्यक ठरणार आहे. त्यात जानेवारी २०२६ मध्ये पक्ष व चिन्ह याचा निकाल सर्वोच्च न्यायालय देणार आहे. सर्वोच्च न्यायालयाचा निकाल काय असेल हे गुलदस्त्यात असले तरी तुम्ही–आम्ही समजू शकतो. तरीही निकाल शिंदेंच्या शिवसेनेविरोधात गेला तर मात्र शिवसेनेला भाजपमध्ये विलीन होणे हाच पर्याय राहील. एकीकडे भाजपशी शीतयुद्ध, पक्षांतर्गत वादावादी आणि सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाची टांगती तलवार यामुळे शिवसेना अस्वस्थ झाली आहे, हेही तितकेच खरे...

# औरंगजेबासमोर न झुकलेले काश्मिरी हिंदूंचे रक्षणकर्ते... गुरु तेग बहादूर

**हॅलो प्रभात**

दिल्लीतील शिखांचा एक जत्था ११ ऑगस्ट १६६४ च्या दिवशी पंजाबच्या दिशेनं रवाना झाला. हा जत्था निघण्यापूर्वी सहा महिने शिखांचे आठवे गुरू हरकिशन यांनी बकालामध्ये त्यांचा उत्तराधिकारी मिळेल असं सांगितलं होतं. त्यांच्या मृत्यूनंतर हा जत्था पंजाबमधील बकाल गावाच्या दिशेनं निघाला. बकाल गावात शिखांची एक विशेष सभा बोलावण्यात आली होती. या सभेत तेग बहादूर यांना शिखांचे पुढचे गुरू म्हणून घोषित करण्यात आलं. या पारंपरिक समारंभात गुरदित्ता रंधावा यांनी नव्या गुरूंच्या कपाळावर भगवा नाम ओढून त्यांना नारळ आणि पाच पैसे दिले आणि त्यांना गुरूच्या गादीवर बसवलं. सुरुवातीच्या काळात गुरू तेग बहादूर फारसे बोलके नव्हते.

याच दरम्यान कामरूपच्या राजाने बंड केलं होतं. त्याचं हे बंड शमविण्यासाठी औरंगजेबाने राजा रामसिंग याच्यावर जबाबदारी सोपवली. त्या काळात कामरूपला धोकादायक मानलं जायचं, कारण इथल्या शूर योद्ध्यांची आणि काळ्या जादूची चर्चा असायची. राजा राम सिंह यांचा गुरु तेग बहादूर यांच्या आध्यात्मिक सामर्थ्यावर प्रचंड विश्वास होता. राजा राम सिंहाने गुरू तेग बहादूर यांना कामरूपच्या मोहिमेत सहभागी होण्याची विनंती केली आणि तेग बहादूरांनी देखील ती विनंती नाकारली नाही.

### आसाममध्ये तीन वर्षांचं वास्तव्य

सरबप्रीत सिंह लिहितात, या युद्धाच्या कालावधीत तेग बहादूर यांनी आसाममध्ये तीन वर्ष घालवली. या दरम्यान त्यांनी मध्यस्थांची भूमिका पार पाडली. पाटण्यात आल्यावर त्यांना पंजाबमध्ये येण्याची विनंती करण्यात आली, कारण पंजाबमध्ये त्यांची गरज होती, त्यामुळं त्यांना त्यांच्या पत्नीला भेटता आलं नाही. मार्च १६७२ मध्ये ते चक नानकीच्या गादीवर परतले. त्यांनी अशा ठिकाणी प्रवास केला, जिथं गुरू नानक वगळता इतर कोणत्याही शीख गुरूंनी भेट दिली नव्हती.

खुशवंत सिंह त्यांच्या 'ए हिस्ट्री ऑफ द सिख्स' या पुस्तकात लिहितात, गुरू तेग बहादूर अत्यंत नम्र स्वभावाचे असल्याने सामान्य लोकांमध्ये लोकप्रिय झाले. धीरमल यांनी त्यांची हत्या करण्याचा प्रयत्न केला, पण त्यात त्यांना यश आलं नाही. तेग बहादूर बकाला सोडून अमृतसरला आले, पण हरमंदिर साहिबचे दरवाजे त्यांच्यासाठी बंद केले गेले. मग ते तिथून त्यांच्या वडिलांनी वसवलेल्या किरतपूर गावी गेले. तिथूनच पाच किलोमीटर अंतरावर त्यांनी आनंदपूर नावाचं नवं गाव वसवलं. आज या ठिकाणाला आनंदपूर साहिब या नावाने ओळखलं जातं. पण इथंही त्यांच्या शत्रूंनी त्यांना सुखानं राहू दिलं नाही.

### काश्मिरी पंडितांची विनंती

२५ मे १६७५ मध्ये गुरु तेग बहादूर आनंदपूर साहिबमध्ये एका संगतीत बसले होते, तिथंच काश्मिरी पंडितांचा एक गट त्यांच्या भेटीसाठी आला. पंडित किरपा राम या गटाचं नेतृत्व करत होते. त्यांनी तेग बहादूरांपुढं हात जोडले आणि त्यांना म्हणाले की, हजारो वर्षांपूर्वीचा त्यांचा धर्म धोक्यात आलाय. औरंगजेबाने नेमलेला काश्मीरचा गव्हर्नर इफ्तेखार खान याने सगळ्यांना इस्लामचा स्वीकार करण्याची सक्ती केलीय. जो कोणी इस्लाम स्वीकारणार नाही त्यांना मृत्युदंड देण्यात येईल असाही आदेश दिलाय. किरपा रामची ही कहाणी ऐकून गुरू तेग बहादूर यांचं मन द्रवलं, पण त्यांनी त्यांच्या विनंतीवर लगेच काही उत्तर दिलं नाही. हरी राम गुप्ता त्यांच्या गुरु तेग बहादूर यांच्या चरित्रात लिहितात, काश्मिरी पंडितांशी बोलताना गुरू तेग बहादूर म्हणाले, बादशाहाच्या प्रतिनिधींना सांगा की, ज्या दिवशी गुरु तेग बहादूर इस्लामचा स्वीकार करतील तेव्हा आम्हीही आमचा धर्म बदलू. गुरू तेग बहादूर यांनी त्यांच्या कुटुंबियांचा आणि साथीदारांचा निरोप घेतला आणि सर्वांना सांगितलं की, त्यांच्यानंतर पुढचे शीख गुरू त्यांचे पुत्र गोविंद राय बनतील. ११ जुलै १६७५ रोजी गुरु तेग बहादूर आपल्या पाच अनुयायांसह दिल्लीकडे निघाले. त्यात भाई मती दास, त्यांचे धाकटे भाऊ सती दास, भाई दयाला, भाई जैता आणि भाई उदय होते. थोडं अंतर चालून गेल्यावर त्यांनी भाई उदय




आणि भाई जैता पुढची बातमी काढण्यासाठी दिल्लीला पाठवलं. पण पुढच्याच दिवशी त्यांना रोपड पोलीस स्टेशनचे हकीम मिर्झा नूर मोहम्मद खान यांनी मलिकपूरमधील रंघारण गावात अटक केली.

### औरंगजेबाची चेतावणी

डॉ. त्रिलोचन सिंह त्यांच्या 'गुरु तेग बहादूर प्रोफेट एंड मार्टियर' या पुस्तकात लिहितात, औरंगजेब सकाळी ९ वाजता दिवाण–ए–आममध्ये दाखल झाला. त्याने सफेद सिल्कचा झब्बा घातला होता. त्याच्या कमरेला एक सिल्कचा कमरबंद होता त्याला रत्नजडित खंजीर लटकवला होता. डोक्यावर सफेद साफा होता. बादशाहाच्या दोन्ही बाजूला किन्नर उभे होते. याकच्या शेपटीपासून आणि मोरांच्या पंखापासून बनवलेल्या पंख्यांनी ते बादशहाला वारा घालत होते. बादशहाला आधी शीख धर्माची माहिती देण्यात आली. त्याला हे ही माहीत होतं की मुस्लिमांप्रमाणे शीखही मूर्तीपूजेच्या विरोधात आहेत. त्याला असं वाटत होतं की तो गुरू तेग बहादूरांना इस्लाम स्वीकारण्यास राजी करेल. औरंगजेबाने गुरू तेग बहादूर यांना सांगितलं की, तुमचा ना मूर्तीपूजेवर विश्वास आहे, ना या ब्राह्मणांवर, मग तरीही तुम्ही यांचं प्रकरण माझ्याकडे घेऊन का आलाय? गुरू तेग बहादूरांनी औरंगजेबाला आपल्या परीने सांगायचा प्रयत्न केला मात्र तरीही औरंगजेब काही ऐकला नाही. शेवटी दरबारात स्पष्ट करण्यात आलं की, त्यांनी एकतर इस्लाम स्वीकारावा नाहीतर मरायला तयार व्हावं. गुरु तेग बहादूर यांना लोखंडी पिंजऱ्यात घालून बेड्या ठोकण्यात आल्या. औरंगजेबाने गुरू तेग बहादूरांकडे बरेच दूत पाठवले, पण त्यांनी आपला मुद्दा सोडला नाही.

### तीन साथीदारांना मृत्यूदंड

गुरू तेग बहादूर आपल्या म्हणण्यावरून माघार घेत नाहीयेत असं कळताच त्यांच्या साथीदारांचा छळ सुरू करण्यात आला. हरी राम गुप्ता त्यांच्या गुरु तेग बहादूर यांच्या चरित्रात लिहितात, चांदणी चौकात जिथं आज कोतवाली आहे, तिथं कारंज्याजवळ भाई मती दास यांची वार करून हत्या करण्यात आली. त्यांनी या अत्याचाराचा सामना शांती आणि धैर्याने केला, आजही शिखांच्या दैनिक 'अरदास'मध्ये त्यांचा उल्लेख केला जातो. तिथं जवळच गुरू तेग बहादूर उभे होते, त्यांना पाहून मतीदास यांनी आशीर्वाद घेण्यासाठी हात जोडले. त्यानंतर सती दास यांना उकळत्या तेलात टाकण्यात आलं तर दयाला यांच्या अंगाला कापूस गुंडाळून एका खांबाला बांधण्यात आलं आणि नंतर त्याला आग लावण्यात आली. हा सर्व प्रकार पाहण्यासाठी तिथं मोठी गर्दी जमली होती. आणि हे सर्व गुरू तेग बहादूर यांच्या डोळ्यासमोर सुरू होतं. गुरू तेग बहादूर सतत वाहे गुरूंचा जप करत होते. तिथं जैता दास नावाचे आणखीन एक शिष्य उपस्थित होते. त्यांनी त्या रात्री मारलेल्या इतर शिष्यांचे मृतदेह जवळून वाहणाऱ्या जमुना नदीत फेकून दिले.

### गुरू तेग बहादूरांचा शेवटचा दिवस

ज्या दिवशी गुरू तेग बहादूरांना मृत्युदंड देण्यात येणार होता, त्यादिवशी ते झोपेतून लवकर जागे झाले. कोतवालीजवळील विहिरीवर त्यांनी आंघोळ करून प्रार्थना केली. २४ नोव्हेंबर १६७५ रोजी ११ वाजता त्यांना फाशीच्या ठिकाणी नेण्यात आलं. तिथं काझी अब्दुल वहाब बोरा यांनी त्यांना फतवा वाचून दाखवला. जल्लाद जलालुद्दीन समोर तलवार घेऊन उभा होता. त्या क्षणाला आकाशात ढग दाटून आले होते, लोक रडत होते. गुरु तेग बहादूर यांनी दोन्ही हात वर करून उपस्थितांना आशीर्वाद दिला. जलालुद्दीनने गुरु तेग बहादूर यांचा शिरच्छेद करताच गर्दीत शांतता पसरली. ज्या ठिकाणी गुरु तेग बहादूर यांचा शिरच्छेद करण्यात आला, त्याच ठिकाणी नंतर सिसगंज गुरुद्वारा बांधण्यात आला. तेग बहादूर यांचे शिष्य जैता दास यांनी त्यांचं शीर दिल्लीपासून ३४० किमी अंतरावर वसलेल्या आनंदपूरला नेलं आणि त्यांच्या नऊ वर्षांच्या मुलाला गोविंद राय यांना दिलं. त्यांच्या मुलाने ते शीर आनंदपूर साहिबमध्ये सन्मानपूर्वक दफन केलं. लखी शाह नामक व्यक्तीने कोतवालीपासून आठ किलोमीटर दूर असलेल्या रकाबगंज इथं गुरू तेग बहादूर यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार केले. तिथंच त्यांच्या स्मरणार्थ गुरुद्वारा बांधण्यात आला.

## सीडीएसएलने केली आयडीयाथॉनची सुरुवात

**मुंबई : हॅलो प्रभात**

आशियातील पहिली सूचीबद्ध डिपॉझिटरी आणि १६.७ कोटींहून अधिक डी–मॅट खात्यांची विश्वासार्ह संरक्षक असलेली सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस लिमिटेडने विद्यार्थ्यांसाठी एक नवीन आव्हानात्मक उपक्रम सुरू केला आहे. विद्यार्थ्यांसाठी त्यांनी पहिले आयडीयाथॉन लाँच केले आहे. सीडीएसएलच्या वार्षिक रीइमॅजिन चर्चासत्राच्या तिसऱ्या आवृत्तीअंतर्गत पुनर्कल्पना आयडीयाथॉन हा उपक्रम राबवण्यात येत आहे. भारतातील शिकण्याच्या, गुंतवणूक करण्याच्या आणि वाढीच्या पद्धतीत बदल घडवून आणतील अशा उपाययोजना डिझाइन करण्यात तरुण नवोन्मेषी मनांना गुंतवून ठेवणे हे आयडीयाथॉनचे उद्दिष्ट आहे. जेणेकरून सहभाग अधिक जबाबदार आणि समावेशक होईल.

## व्हॅल्यू ३६० कम्युनिकेशन्सला एनएसईकडून तत्वत मंजूरी

**मुंबई : हॅलो प्रभात**

व्हॅल्यू ३६० कम्युनिकेशन्स लिमिटेडने घोषणा केली की, कंपनीला एनएसईच्या इमर्ज प्लॅटफफॉर्मवर त्यांचे इक्विटी शेअर्स सूचीबद्ध करण्यासाठी नॅशनल स्टॉल एक्स्चेंज ऑफ इंडियाकडून तत्वत: मंजूरी मिळाली आहे, ज्यासाठी कंपनीने सर्व नियामक आवश्यकतांची, तसेच आवक औपचारिकतांची पूर्तता करणे आवश्यक आहे. कंपनीचे ड्राफ्ट रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस दाखल केल्यानंतर मिळालेली ही तत्वतः मंजूरी महत्त्वपूर्ण नियामक टप्पा आहे. ही मंजूरी म्हणजे इश्यूला पुष्टी मिळाल्याचा किंवा सादर करण्यात आलेल्यामान्यता मिळाल्याचा अर्थ होत नाही.

## गौतम अदाणी यांनी इंडोलॉजी मिशनला १०० कोटींचे योगदान केले जाहीर

**अहमदाबाद : हॅलो प्रभात न्यूज नेटवर्क**

अदाणी ग्लोबल इंडोलॉजी कॉन्क्लेव्हच्या उद्घाटन सत्रात,अदाणी ग्रुपचे अध्यक्ष गौतम अदाणी यांनी भारत नॉलेज ग्राफ बांधण्यासाठी एक ऐतिहासिक वचनबद्धता जाहीर केली.ही कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात भारताच्या सभ्य ज्ञानाचे जतन, रचना आणि भविष्यासाठी योग्य अशी पहिली डिजिटल चौकट आहे. अदाणी ग्रुप,शिक्षण मंत्रालयाच्या इंडियन नॉलेज सिस्टीम्सच्या सहकार्याने, भारताच्या सभ्यता, भाषा, तत्वज्ञान, विज्ञान आणि सांस्कृतिक वारशाचा जागतिक शैक्षणिक अभ्यास –इंडोलॉजीला पुनरुज्जीवित करण्यासाठी तीन दिवसीय ग्लोबल इंडोलॉजी कॉन्क्लेव्हचे आयोजन करत आहे.

## ड्रोनाचार्य एरियलची अर्धवार्षिक प्रदर्शनाची घोषणा

**पुणे : हॅलो प्रभात**

ड्रोनाचार्य एरियल इनोवेशन्स लिमिटेड, बीएसई एसएमई वरील भारताच्या प्रथम सूचीबध्द ड्रोन स्टार्टअपने ३०सप्टेंबर २०२५ रोजी संपलेल्या अर्धवर्षाच्या आपल्या स्टँडअलोन आर्थिक परिणामांची घोषणा केली, ज्यामध्ये तिच्या डिफफेन्स, प्रशिक्षण आणि ड्रोन सेवा पोर्टफोलिओमध्ये दीर्घकालीन व्यवसाय गतिशीलता आढळली आहे. H1 FY2025-26 साठी कार्यांमधला स्टँडअलोन महसूल ९५७.९३ लाख एवढा होता आणि एकूण महसूल १०७८.१८ लाख होता. ३०सप्टेंबर २०२५ रोजी संपलेल्या झालेल्या अर्धवर्षासाठी एइखढऊअ ४६२.२० लाख असून, करोत्तर निव्वळ नफा १९४.२७ लाख घोषित केला गेला, यावरुन कंपनीच्या कार्यात्मक सर्वोत्कृष्ठतेवर आणि मार्जिन सुधारणेवर असलेला निरंतर भर प्रतिबिंबीत होतो.

## रिलायन्स फाऊंडेशनचा क्रीडा क्षेत्रातील योगदानाबद्दल सन्मान

**मुंबई : हॅलो प्रभात**




FICCI च्या १५ व्या ग्लोबल स्पोर्ट्स समिट 'TURF 2025' आणि 'इंडिया स्पोर्ट्स अवॉर्ड्स २०२५'मध्ये रिलायन्स फाऊंडेशनला क्रीडा क्षेत्रातील योगदानासाठी सन्मानित करण्यात आले. नीता एम. अंबानी यांच्या नेतृत्वाखाली रिलायन्स फाऊंडेशनने तळागाळापासून उच्च–प्रदर्शन पातळीपर्यंत क्रीडा क्षेत्र सशक्त करण्यासाठी सातत्यपूर्ण काम केले आहे. क्रीडा क्षेत्रातील त्यांच्या नेतृत्वामुळे नीता अंबानी यांना देशाच्या 'उदीयमान स्पोर्ट्स लीडर' म्हणूनही पाहिले जाते. नीता अंबानी यांनी हा पुरस्कार रिलायन्स फाऊंडेशन परिवाराला आणि देशातील तरुण खेळाडूंना समर्पित केला. त्या म्हणाल्या, येणारे दशक भारतीय क्रीडाजगताचे सुवर्ण दशक ठरणार आहे. २०३६ ऑलिंपिक गेम्सचे आयोजन करणे हे १.४ अब्ज भारतीयांचे सामूहिक स्वप्न आहे, आणि हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी फाऊंडेशन कटिबद्ध आहे.

## एंजल वनने गुंतवणूकदारांना अनधिकृत गुंतवणूकींबाबत केले सतर्क

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

एंजल वन लिमिटेड या फिनटेक क्षेत्रातील आघाडीच्या कंपनीने गुंतवणूकदारांना एंजल वनच्या नावाचा गैरवापर करून आणि त्यांचे वरिष्ठ अधिकारी असल्याचे खोटे सांगत फसवणूक करणाऱ्या सोशल मीडिया ग्रुप्सबाबत सतर्क केले आहे. कंपनीला व्हॉट्सअ‍ॅप व टेलिग्राम अशा सोशल मेसेजिंग प्लॅटफफॉर्म तयार करण्यात आलेले अनेक अनधिकृत ग्रुप्स निदर्शनास आले आहेत, जे एंजल वनचे ब्रँड नाव व लोगोचा, तसेच त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नावांचा व प्रतिष्ठेचा बेकायदेशीर व फसवणूक करणाऱ्या पद्धतीने गैरवापर करत आहेत. तुमच्याबाबतीत कोणताही संभाव्य घोटाळा झाल्यास सायबरक्राइम पोर्टल cybercrime.gov.in च्या माध्यमातून किंवा हेल्पलाइन १९३० शी संपर्क साधत किंवा तुमच्या जवळच्या पोलिस स्टेशनमध्ये जाऊन किंवा आम्हाला ceoescalation@angelone.in येथे ईमेल करत तक्रार करू शकता.

## ऑक्सिलाइफ सलून प्रोफेशनलची ॲडव्हान्स फेशियल रेंज सादर

**मुंबई : हॅलो प्रभात**



डाबर इंडियाच्या प्रीमियम सलून स्किनकेअर ब्रँड ऑक्सिलाइफ सलून प्रोफेशनलने आज तीन अत्याधुनिक सिंगल–यूज फेशियल ट्रीटमेंट किट्स कोरियन ग्लास ग्लो, ग्लूटामिन व्हाइट रेडियन्स आणि हायड्रा बूस्ट रेडियन्सच्या लाँचची घोषणा केली. या लाँचला 'रेडियन्स व्हिसा – पॉवर्ड बाय स्किनश्युरन्स विथ ऑक्सिलाइफ' या मोहक नवीन कॅम्पेनचा आधार मिळाला असून या कॅम्पेनचे नेतृत्व मिस यूनिव्हर्स इंडिया २०२५ मनिका विश्वकर्मा यांनी केले आहे. विशेषतः सलूनसाठी विकसित केलेल्या या फेशियल ट्रीटमेंट रेंजमध्ये अत्याधुनिक जागतिक वैज्ञानिक संशोधन आणि निसर्ग–प्रेरित सक्रिय घटकांचा समन्वय आहे, ज्यामुळे त्वचेला तत्काळ आणि दीर्घकालीन ग्लो मिळतो. या रेंजच्या अनावरणासाठी ब्रँडने स्किनश्युरन्स विथ ऑक्सिलाइफ या मुख्य संकल्पनेवर आधारित एक धाडसी डिजिटल–फर्स्ट टीझर मोहीम राबवली.

## इन्शुरन्स अवेअरनेसकडून बिमा ग्राम एपीआयचे कौतुक

**मुंबई : हॅलो प्रभात**

ग्रामीण भागातील विमा उपलब्धतेचा अनुभव बदलण्यासाठी इन्शुरन्स अवेअरनेस कमिटी (IAC-Life) ने IRDAI (भारतीय विमा नियामक व विकास प्राधिकरण) च्या बिमा ग्राम एपीआय उपक्रमाचे जोरदार समर्थन केले आहे. हा डिजिटल उपक्रम भारतातील ग्रामीण भागांमधील विमा कव्हरेज डेटा सुव्यवस्थित व प्रमाणित करण्यासाठी तयार करण्यात आला आहे. बिमा ग्राम एपीआय ची निर्मिती नॅशनल इन्फॉर्मेटिक्स सेंटर (NIC) द्वारे पंचायती राज मंत्रालय (MoPR), डिपार्टमेंट ऑफ पोस्ट्स, आणि भारतीय विमा माहिती ब्युरो (IIBI) यांच्या सहकार्याने करण्यात आली आहे. हा अझख लोकल गव्हर्नमेंट डिरेक्टरी (LGD) कोड्स ला पोस्टल पिन कोड्स शी जोडतो. यामुळे ग्रामीण ओळखीसाठी एकीकृत आणि पडताळणी करता येण्याजोगा डेटाबेस तयार होतो.विमा कंपन्या आता ग्राहकाचा पिन कोड वापरून थेट संबंधित ग्राम पंचायतीचे चे नाव मिळवू शकतात, ज्यामुळे विमा पॉलिसीच्या ग्रामीण ठिकाणाची त्वरित डिजिटल पडताळणी होते.

नवे विचार...नवी सुरुवात
दैनिक हॅलो प्रभात

■ दैनिक **हॅलो प्रभात** हे पत्रक, मुद्रक शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक व मालक गणेश बंडा पाटील यांच्याकरिता, मे. कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२ महावीरनगर, सांगली – ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथे छापून **दैनिक हॅलो प्रभात**, कार्यालय, ब्लॉक नं. 'ए', कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली– ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले.
■ **सांगली मुख्य कार्यालय** : ब्लॉक नं. 'ए', कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली. ■ **पुणे कार्यालय** : १६७७, सदाशिव पेठ, अमित रेसिडेन्सी, एस.पी. कॉलेज जवळ, पुणे–४११०३०
■ **सांगली शहर संपर्क** : ९०२१६५१९७६ ■ **कोल्हापूर कार्यालय** : एस ९४६, GF-7, गुलमर्ग अपार्टमेंट, सरनाईक कॉलनी, शिवाजी पेठ, कोल्हापूर–४१६००२
■ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या यामधून व्यक्त झालेल्या मताशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. (सांगली न्यायकक्षेत)
■ निवासी संपादक : संजीव शाळगावकर ■ मुख्य संपादक : गणेश पाटील-सावर्डेकर



# शहरातील उध्वस्त केलेल्या मूलभूत सोई-सुविधा पुन्हा दुरुस्त करु : आ.जयंतराव पाटील

## शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने विकासाची दशसूत्री जाहीरनामा

**ईश्वरपूर : हॅलो प्रभात**

उरूण ईश्वरपूर नगरपालिकेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने माजी मंत्री आ.जयंतराव पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये दशसूत्री जाहीरनामा प्रकाशित करण्यात आला. आमची सत्ता आल्यानंतर आम्ही शहरातील नागरिकांना कोणत्या मुख्य १० सोई-सुविधा उपलब्ध करून देणार आहोत, हे सांगणारा आमचा जाहीरनामा आहे. आमच्या सहकाऱ्यांना संधी द्या, मी व माझे सहकारी हा जाहीरनामा पूर्ण करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा करू,अशी ग्वाही आ.जयंतराव पाटील यांनी याप्रसंगी दिली.

यावेळी प्रा.शामराव पाटील,राष्ट्रवादी कॉंग्रेसचे शहराध्यक्ष शहाजी पाटील,जेष्ठ नेते बी.ए. पाटील (बापू),माजी नगराध्यक्ष पै.भगवान पाटील,माजी नगरसेवक खंडेराव जाधव, माजी उपनगराध्यक्ष दादासाहेब पाटील,माजी महिला शहराध्यक्षा रोझा किणीकर,प्रदेश सदस्या



कमल पाटील,प्राचार्य राजेंद्र कुरळपकर,शेतकरी संघटनेचे गणेश शेवाळे प्रामुख्याने उपस्थित होते.

आ.पाटील म्हणाले,या शहरातील उध्वस्त केलेल्या मूलभूत सोई-सुविधा पुन्हा दुरुस्त करणे, हे मोठे आव्हान आहे. पिण्याच्या पाण्याची,तसेच रस्त्यांची दुरावस्था झाली आहे. शहरातील वाहतूक कोंडी हा गंभीर विषय आहे. आम्ही शहरातील मूलभूत सोई- सुविधा दुरुस्त करून प्रशासन पारदर्शी आणि लोकाभिमुख करणार आहोत. शहरातील बेघरांच्या घरकुल योजना मार्गी लावणे, शिक्षणाचा दर्जा वाढविणे,तसेच हे शहर पुन्हा राज्यातील एक प्रगत व स्वच्छ- सुंदर शहर बनवू. आमच्या सुशिक्षित,अनुभवी,तरुण सहकाऱ्यांना आशिर्वाद द्यावा. आमच्यामध्ये गट-तट नाहीत,आमचे कार्यकर्ते एकजिनसी पणाने काम करीत आहेत. मूलभूत व नागरी सुविधा,हरित व स्वच्छ शहर,महिला व युवा सक्षमीकरण,आरोग्यदायी समाज,गुणवत्ता पूर्ण शिक्षण,कृषी विकास,सर्व समावेशक विकास,पारदर्शी प्रशासन,स्थानिक उद्योग व रोजगार आणि सांस्कृतिक वारसा,संरक्षण व विकास अशी ही शाश्वत विकासाची दशसूत्री आहे.

प्रा.शामराव पाटील म्हणाले,आम्ही शहरात राहणाऱ्या नागरिकांच्या सूचना घेऊन वास्तव वादी जाहीरनामा देत आहोत. आम्हास शहरातील मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या निवडणुकीत १९८५ ची पुनरावृत्ती होऊन आमचे नगराध्यक्ष व सर्व उमेदवार विक्रमी मतांनी विजयी होणार आहेत. शहाजी पाटील म्हणाले,आम्ही गेल्या पाच वर्षात काय केले,आणि पुढील पाच वर्षात काय करणार हे सांगत लोकांच्या दारात जात होतो. मात्र विरोधकांनी २०१६ पासून ही ३५ वर्षाची परंपरा खंडीत केली आहे. सत्ता नसताना आ.जयंतराव पाटील यांनी शहराच्या विकासाला कोट्यावधी रुपयांचा निधी दिला आहे. माजी उपनगराध्यक्ष शंकरराव चव्हाण, संचालक शैलेश पाटील,उमेश रायगांधी,युवक शहराध्यक्ष दिग्विजय पाटील,राजू खरात, संजय खवळे,रविंद्र वाघमोडे,चंद्रकांत ताटे, सुनिल माळी,मनोज करे यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

---

# ● संमिश्र ●

## शिवकामगार सेनेच्या राज्य कार्याध्यक्षपदी डॉ.स्वप्निल माने-पाटील




**पुणे : हॅलो प्रभात**

शिवसेना (शिंदे गट) शिव कामगार सेना रुग्णालय राज्य कार्याध्यक्षपदी सामर्थ्य जनशक्ती संघटनेचे युवा प्रदेशाध्यक्ष डॉ. स्वप्निल माने-पाटील यांची निवड करण्यात आली. शिवसेनेचे मुख्य सचिव संजय मोरे यांच्या हस्ते निवडीचे पत्र डॉ.माने-पाटील) यांना पक्षाचे मुख्य कार्यालय बाळासाहेब भवन, मंत्रालय समोर, मुंबई येथे देण्यात आले. यावेळी शिव कामगार सेनेचे राज्यप्रमुख सुधीर कुरुमकर,पांडुरंग पाटील, प्रशांत पालांडे, विश्वास दिघे, सचिन राक्षे व इतर वरिष्ठ नेते मंडळींच्या उपस्थितीत देण्यात आले.यावेळी त्यांच्याकडून शुभेच्छा पर मार्गदर्शन मिळाल्याचे माने पाटील यांनी म्हटले आहे. ही नियुक्ती महाराष्ट्राचे उप-मुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख एकनाथजी शिंदे यांच्या आदेशानुसार करण्यात आली आहे. माने पाटील यांच्यावर याआगोदरच शिवसेना शिव कामगार सेनेच्या राज्य संपर्क प्रमुख पदाची जबाबदारी देखील आहे. या दोन्ही जबाबदाऱ्यांमुळे या पुढील काळात संपूर्ण महाराष्ट्र राज्यात कामगार हिताय, कामगार सुखाय या उद्दिष्टनुसार कामगार क्षेत्रात व इतर सर्वांगीण क्षेत्रात प्रभावी व सकारात्मक कार्य करण्यास ऊर्जा मिळाली, असे यावेळी माने पाटील म्हणाले. यांच्या नियुक्तीने राज्यभरातून शिवसैनिक, कामगार नेते,शिवसेना पदाधिकारी तसेच शिव कामगार सेनेचे राज्यभरातील पदाधिकारी, सामर्थ्य जनशक्ती संघटनेचे पदाधिकारी, कामगार वर्ग यांचा राज्यभरातून अभिनंदनाचा वर्षाव माने पाटील होत आहे. संघटनेच्या पुढील वाटचालीसाठी त्यांचे नेतृत्व नवे बळ देणारे ठरेल, असा विश्वास विविध जिल्ह्यांतील पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. कामगार वर्गाचे प्रश्न सोडविण्यासाठी धोरणात्मक बैठकांचे नियोजन, प्रशिक्षण उपक्रम आणि सामाजिक बांधिलकी जपणारे उपक्रम यावर माने पाटील यांचा विशेष भर असेल. त्यांच्या नेतृत्वामुळे शिव कामगार सेनेच्या कार्यात नवीन ऊर्जा, व्यापक संघटन आणि राज्यभरातील कामगार वर्ग व जनतेशी थेट संवाद वाढेल. असा विश्वास विविध स्तरांतून व्यक्त होत आहे. यावेळी माझ्यावर पक्षनेतृत्वाने दाखविलेला विश्वास हीच माझ्या आजवरच्या कामाची पोचपावती असल्याचे माने पाटील यांनी म्हटले आहे.

## खुंटलेल्या विकासाला गती देण्यासाठी भाजपला साथ द्या : सोनाली नलवडे

**पलूस : हॅलो प्रभात**

पलूस नगरपरिषद निवडणुकीत भाजपाने प्रभाग क्र. ५ मध्ये आपल्या प्रचाराचा जोर वाढला असून भारतीनगर, कन्याशाळा परिसर, दत्त मंदिर परिसर तसेच नवीन वसाहतीत घरोघरी जाऊन प्रभावी जनसंपर्क मोहीम राबवली. भाजपाचे प्रभाग ५ चे उमेदवार अमृत माळी व महिला उमेदवार तृप्ती मुदगल यांनी नगराध्यक्षपदाच्या उमेदवार सोनाली नलवडे आणि नगरसेवक पदाच्या उमेदवार अमृत माळी तृप्ती मुदगल यांना विजयी करण्याचे आवाहन करत विकासराचा संदेश मतदारांपर्यंत पोहोचवला. यावेळी अमृत माळी म्हणाले, पलूसचा खुंटलेला विकास वेगात आणण्यासाठी नगरपरिषदेत भाजपाची सत्ता असणे



अत्यावश्यक आहे. केंद्र व राज्यात भारतीय जनता पक्षाची सत्ता असल्याने भरघोस विकास निधी मिळवणे सहज शक्य आहे आणि आलेला निधी पारदर्शकपणे विकासासाठीच खर्च केला जाईल त्यासाठी खऱ्या अथर्नि विकास कसा असतो हे दाखवण्यासाठी सोनाली नलवडे या योग्य पर्याय आहेत.या प्रचार फेरीत माजी आमदार पृथ्वीराज देशमुख, उद्योजक व संजय गांधी निराधार योजनेचे तालुका अध्यक्ष सर्जेराव अण्णा नलवडे, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष संजय येसुगडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रचार अधिक जोमात सुरू आहे.

---

## एस.एन.डी. स्कूलचा विद्यार्थी राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत द्वितीय

**नातेपुते : हॅलो प्रभात**

राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत नातेपुते येथील एस. एन. डी. इंटरनॅशनल सीबीएसई स्कूलचा इयत्ता सातवी मधील विद्यार्थी राजवर्धन जयंत चिंचकर याने द्वितीय क्रमांक पटकाविला.

सदर स्पर्धा ह्या ज्ञान कला क्रीडा व कृषी प्रतिष्ठान फडतरे नॉलेज सिटी कळंब जिल्हा पुणे येथे आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेसाठी पुणे सोलापूर सातारा या जिल्ह्यातून विद्यार्थी सहभागी झाले होते.



या स्पर्धेमध्ये राजवर्धन चिंचकर याने महाराष्ट्रातील संत परंपरा एक अमूल्य ठेवा हा विषय राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत निवडून आपला भाषणातून परीक्षकाचे व समोर बसलेल्या सर्व उपस्थितांची मने जिंकून राजवर्धन चिंचकर याने स्पर्धेमध्ये द्वितीय क्रमांक मिळविला.

त्याला द्वितीय क्रमांकाबद्दल प्रमाणपत्र, ट्रॉफी व रोख रक्कम १५०० रुपये बक्षीस फडतरे नॉलेज सिटी चे संस्थापक अध्यक्ष उत्तम फरतडे यांच्या शुभहस्ते देण्यात आले. राजवर्धन चिंचकर याने वक्तृत्व स्पर्धेत मिळवलेल्या यशाबद्दल एस. एन. डी. इंटरनॅशनल सीबीएसई स्कूलचे चेअरमन मालोजीराजे देशमुख, महेश शेटे स्वदेश दोशी, यांनी शाळा प्रशासनाच्या वतीने सत्कार करून शुभेच्छा दिल्या. यावेळी प्राचार्य संदीप पानसरे उपप्राचार्य शकूर पटेल पीआरओ मनोज राऊत, शिक्षक सुदर्शन सुतार सुरज ननावरे उपस्थित होते.

## विकासाच्या मुद्यावर विटा पालिकेची निवडणूक लढविणार : अमोल बाबर

**विटा : हॅलो प्रभात**

विटा नगरपालिकेची निवडणूक आम्ही विकासाच्या मुद्यावर ताकतीने लढविणार आहोत. विटेकर जनता आम्हाला आशीर्वाद देऊन चांगल्या मताधिक्याने सत्ता देण्याचे ठरवलेले आहे. त्यामुळे यावेळी विटा नगरपालिकेत सत्ता परिवर्तन अटळ आहे. विटा नगरपालिकेवर शिवसेनेचा भगवा फडकणार आहे, असे प्रतिपादन शिवसेनेचे नेते अमोल बाबर यांनी केले.येथील श्री



विठ्ठल मंदिरात नारळ फोडून शिवसेना उमेदवारांच्या प्रचाराचा प्रारंभ शिवसेनेचे युवा नेते अमोल बाबर यांच्या उपस्थितीत झाला. त्यावेळी ते बोलत होते.

पुढे अमोल बाबर म्हणाले, म्हणाले, मतदार आणि जनतेतून आम्हाला सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. विधानसभा निवडणुकीवेळी विटेकर जनतेला जे शब्द दिले होते. ते शब्द आम्ही विविध विकासकामांच्या माध्यमातून पूर्ण केला आहे.

विटेकर जनतेने टाकलेला विश्वास सार्थ ठरवण्याची जबाबदारी घेऊन आम्ही काम करतोय. मिळालेल्या संधीचे सोने करून विटा शहराला जिल्ह्यातील एक आदर्श शहर करण्याचा आमचा प्रयत्न आहे. त्यामुळे या वेळच्या निवडणुकीत १०० टक्के विटा पालिकेत परिवर्तन अटळ आहे. पालिकेवर शिवसेनेचा भगवा फडकणार आहे.

यावेळी विनोद गुळवणी, तात्या कोरे, माजी सभापती विनय भंडारे, सारंग म्हेत्रे, रामचंद्र भिंगारदेवे, अविनाश बाबर, दिलीप काळेबाग, महेश मेटकरी, संजय लकडे, संजय कोकीळ, गौरव गुळवणी उपस्थित होते.

## पलूसच्या विकासासाठी कटिबद्ध : जोत्स्ना येसुगडे

### जनता राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या सर्व उमेदवारांच्या पाठीशी राहील

**पलूस : हॅलो प्रभात**

शहराचा सर्वांगीण विकास हे स्व. बापूसाहेब येसुगडे यांचे स्वप्न होते. आता हे अधुरे स्वप्न पूर्ण करण्यासाठी माझी उमेदवारी असल्याचे राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या (अजित पवार गट) नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार ज्योत्स्ना येसुगडे यांनी सांगितले.गेल्या ९ वर्षात पलूस येथे कोणताही विकास झालेला नाही पलूसचा खुंटलेला विकास व स्वर्गीय बापूसाहेब यांच्या स्वप्नातील पलूस साकार करण्यासाठी राष्ट्रवादी अजित पवार गट सक्षम आहे. पलूसमधील नागरिकांच्या सर्व समस्या सोडवल्या जातील. यामध्ये पाणी, गटारे, रस्ते,स्ट्रीट लाईट, स्वच्छता यासारख्या अन्य सोयी सुविधा वर आमचा भर असणार आहे. पलूस शहरासाठी राज्य सरकारच्या माध्यमातून जास्तीत जास्त निधी आणण्याचा प्रयत्न अजितदादांच्या माध्यमातून करण्याचा आमचा मानस आहे. पलूसचा सर्वांगीण विकास फक्त राष्ट्रवादी कॉंग्रेसच करू शकते त्यामुळे अजितदादांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या सर्व उमेदवारांच्या पाठीशी जनता राहील, असा मला ठाम विश्वास आहे. यावेळी निलेश येसुगडे, सूर्यकांत मोरे, शामराव धुमके, कपिल गायकवाड, अरुण ब्रह्मो, उमेश पाटील यांच्यासह नगरसेवकपदाचे सर्व उमेदवार उपस्थित होते.

---

## अनिल सातव-पाटील यांच्याकडून भव्य महाकाल दर्शन यात्रा



**पुणे : हॅलो प्रभात**

जनसेवेची अखंड परंपरा जपणारे पुण्यनगरीचे श्रावणबाळ अनिल सातव (पाटील) यांनी आतापर्यंत बारा हजार नागरिकांना मोफत उज्जैन महाकाल दर्शन यात्रा घडवत समाजसेवेचे अनोखे उदाहरण निर्माण केले आहे. नागरिकांची बाबा महाकालांच्या दर्शनाची इच्छा पूर्ण व्हावी, याकरिता त्यांनी ही भव्य मोफत उज्जैन दर्शन यात्रा आयोजित केली होती.या यात्रेअंतर्गत भाविकांना पुणे रेल्वे स्टेशनपर्यंत ने-आण, त्यानंतर स्पेशल रेल्वेद्वारे उज्जैनकडे प्रवास, तसेच उज्जैनमध्ये निवास व भोजनाची सर्व सोय अनिल सातव पाटील यांच्या माध्यमातून करण्यात आली. विशेष म्हणजे भाविकांना फक्त महाकालांचे दर्शनच नव्हे, तर सभोवतालचा ऐतिहासिक व पवित्र परिसर देखील दाखविण्यात आला.या उपक्रमाविषयी बोलताना अनिल सातव पाटील म्हणाले, जनसेवा हीच माझी प्रेरणा असून नागरिकांची श्रद्धा व भावना लक्षात घेऊन मोफत दर्शन यात्रेचे आयोजन केले. विविध टप्प्यांमध्ये सुमारे १२ हजार नागरिकांना बाबा महाकालांचे दर्शन घडवण्याचे भाग्य मला लाभले. ही सेवा पुढील काळातही सुरू राहील.

## सुशांत खाडे यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमाने साजरा

**मिरज : हॅलो प्रभात**

आ.डॉ. सुरेशभाऊ खाडे यांचे सुपुत्र सुशांतदादा खाडे यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रम राबवून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. मिरजेतील मनपाच्या आस्था महिला बेघर केंद्रात असणाऱ्या महिलांना ब्लॅंकेट्स व फळे सुशांत दादा खाडे यांच्या शुभहस्ते वाटप करण्यात आले.



तसेच मिरजेतील शासकीय रुग्णालयात वेगवेगळ्या वॉर्डात दाखल असणाऱ्या रुग्णांना, महिलांना, लहान बालकांना ब्लॅंकेट्स आणि फळे याचे वाटप करण्यात आले.

पार्श्वनाथ नगर येथील प्राणीमित्र अशोक लाकडे यांच्या गोशाळेत चार प्रदान करण्याचा उपक्रम राबविण्यात आला. त्याचबरोबर शहरातील अनाथ आश्रम, वृद्धाश्रम याठिकाणी कार्यकत्यांनी फळे, बिस्किटे यांचे वाटप केले. पार्श्वनाथ नगर येथील गोशाळेत चारा वाटप करण्यात आला.

---

# वाई नगरपालिकेचे मैदान २० जणांनी सोडले

**वाई : हॅलो प्रभात**

वाई नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ अर्ज माघार घेण्याच्या दिवशी शुक्रवार दि. २१ रोजी अपक्षांसह सर्वपक्षीय २० उमेदवारांनी आपले निवडणूक अर्ज माघार घेण्यात आले, तर नगराध्यक्ष पदासाठी चार उमेदवार रिंगणात असून २२ जागांसाठी ६१ उमेदवार नगरसेवक म्हणून निवडणूक लढविणार आहेत. तर प्रभाग नउन्मधून राष्ट्रवादीचा एक उमेदवार बिनविरोध निवडून आलेला आहे. तसेच जनतेतून नगराध्यक्ष म्हणून राष्ट्रवादीचे डॉ. नितीन कदम, भाजपचे अनिल सावंत, राष्ट्रीय कॉंग्रेसचे प्रदीप जायगुडे, व अपक्ष म्हणून दीपक जाधव निवडणूक लढविणार आहेत, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार सोनाली मेटकरी यांनी दिली. वाई नगरपालिकेच्या निवडणुकीतून माघार घेतल्यांची नावे पुढील प्रमाणे नगराध्यक्ष पदाच्या शर्यतीतून शरद पवार गटाचे तेजपाल वाघ, एकनाथ शिंदे शिवसेनेचे

### २२ जागांसाठी ६१ उमेदवार रिंगणात





प्रवीण शिंदे, भाजपचे विजय बेकाणे यांनी माघार घेतली. तर नगरसेवक पदाच्या निवडणुकीतून प्रभाग २ ब मधून सुप्रिया सचिन पेटकर, गीता प्रशांत ढगे, प्रभाग ३ अ मधून चंद्रकांत गोकुळ वैराट, ब मधून सरिता हेमंत भोरे, आफरीन अली असगर शेख, प्रभाग ४ व मधून अमोल दादासाहेब पवार, प्रभाग ६ व मधून महेश रामचंद्र गायकवाड, अविनाश प्रताप लोखंडे, रुपेश सुधाकर जाधव, प्रभाग ७ अ मधून दिलीप भीमराव शिंदे, ७ ब मधून स्वप्नाली जयदीप शिंदे, शुभदा प्रांत नागपूरकर, प्रभाग ८ ब मधून पूनम विकास जाधव, प्रतिभा दत्तात्रय हगवणे, प्रभाग ९ व मधून शंकर दत्ता खरात, बापूराव साहेबराव खरात, प्रभाग १० अ मधून प्रणीता मयूर खरात, १० ब मधून रवींद्र हरिवंद्र भोसले, प्रभाग ११ अ मधून निलेश किशोर हेट्काळे यांनी आपले उमेदवारी अर्ज माघारी घेतले आहेत.भाजपमधून अनिल सावंत, डॉ. नितीन कदम राष्ट्रवादीतून तर प्रदीप जायगुडे कॉंग्रेसमधून व अपक्ष उमेदवार दीपक जाधव नगराध्यक्ष पदाची निवडणूक लढविणार,महाविकास आघाडीचे तेजपाल वाघ, शिवसेनेचे प्रवीण शिंदे आणि भाजपचे विजय ढेकाणे यांची माघार,राष्ट्रवादीचा प्रभाग ९ मधील सौ. रेखा कांताराम जाधव बिनविरोध,वाई नगरपालिकेच्या निवडणुकीत भाजप शिवसेनेला आपले पॅनल पूर्ण करता आलेले नाही. तर राष्ट्रवादी कॉ 'ग्रेस पक्षाने आपले सर्व उमेदवार रिंगणात उतरविले असून विरोधकांना एका प्रकारचा धक्का दिला आहे.



## विरोधकांच्या श्रेयवादाची पुराव्यासह पोलखोल

### वैभव शिंदे

**आष्टा : हॅलो प्रभात**

आष्टा शहरात झालेल्या विकासकामांचे खोटे श्रेय घेणाऱ्या विरोधकांची आज आष्टा शहर विकास आघाडीकडून पुराव्यासकट पोलखोल करण्यात आली. नेते वैभव शिंदे, संग्राम फडतरे व माणिक शेळके यांनी संयुक्तरित्या पत्रकार परिषद घेत शहरातील नागरिकांची दिशाभूल करणाऱ्या अपप्रचारावर कठोर टीका केली.

वैभव शिंदे म्हणाले, आज आष्ट्यात दिसणारा विकास हा स्व. विलासराव शिंदे व आ.जयंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आष्टा विकास आघाडीने केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचा परिणाम आहे. मागील नऊ वर्षांत २०५ कोटींचा निधी मिळवून अनेक महत्त्वपूर्ण कामे पूर्ण करण्यात आली. मात्र विरोधक खोटी पत्रके वाटून या कामांचे श्रेय लाटण्याचा प्रयत्न करत आहेत.संग्राम फडतरे म्हणाले, विरोधकांनी ज्या कामांचे श्रेय घेतले आहे, ती सर्व कामे प्रत्यक्षात आघाडीच्या कार्यकाळात मंजूर झाली होती. माणिक शेळके यांनी शासन निर्णय २३/०८/२०२४ आणि आ. जयंत पाटील यांच्या मागणीपत्राचा दाखला देत सांगितले की, आष्टा-अंकळखोप (८.२७ कोटी) व आष्टा-पोखर्णी (६.७५ कोटी) रस्त्यांसाठीचा निधीही विरोधकांनी स्वतःच्या नावावर दाखवला आहे. शासनाने स्पष्टपणे 'आ. जयंत पाटील यांच्या मागणीवर' हा निधी मंजूर केल्याचा उल्लेख असल्याचे त्यांनी सांगितले. यानंतर शिंदे यांनी १५/१२/२०२० च्या ठराव क्रमांक २३३ मधील मटण मार्केट व नगरपालिका नूतनीकरणाची कामेही विरोधकांनी स्वतःची असल्याचे दाखवल्याचा आरोप केला.शहराचा विकास हा आघाडीच्या नेतृत्वाखालीच झाला आहे. खोट्या प्रचाराला नागरिकांनी बळी पडू नये, असे आवाहन केले

# शासनाकडून वसंतरावदादा पाटील महाविद्यालयाचा सन्मान

**तासगाव : हॅलो प्रभात**

संकटातून संकल्पाकडे महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या आवाहनाला साथ देत तासगावच्या पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालयाने मराठवाड्यातील पूरग्रस्त आर.वाय.पी.कला महाविद्यालय विहामांडवा ता. पैठण जि.छत्रपती संभाजीनगर या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत म्हणून प्रत्येक विद्यार्थ्यास वह्या,पेन,बॅग असे कीट,कपडे, खाद्यपदार्थ वआर्थिक मदत करून संकटात सापडलेल्यांना आधार देण्याचे काम केले. महाविद्यालयातील



गुरुदेव कार्यकर्त्यांनी व विद्यार्थ्यांनी पूरग्रस्त भागात भरीव मदत केल्याबद्दल महाराष्ट्र शासनाचा उच्च व तंत्र शिक्षण विभाग,उच्च शिक्षण संचालनालय आणि प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे मॉडर्न कला,विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय (स्वायत्त) शिवाजीनगर पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने पूरग्रस्त भागात मदत केल्याबद्दल श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे अर्थ सहसचिव आणि महाविद्यालयांचे प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे ,श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे, कार्यक्रम अधिकारी प्रा. आण्णासाहेब बागल,शुभम सुवासे यांचा सन्मान उच्च व तंत्र शिक्षण मंत्री ना.चंद्रकांत पाटील,सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.सुरेश गोसावी,उच्च शिक्षण संचालक डॉ.शैलेंद्र देवळाणकर,प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ.गजानन एकबोटे या मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. या सन्मान सोहळ्यात बोलताना उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, शैक्षणिक संस्था केवळ शिक्षणापुरत्या मर्यादित न राहता सामाजिक बांधिलकी जपतात हे अत्यंत अभिमानास्पद आहे. तासगाव महाविद्यालयाने दाखवलेला आदर्श इतरांसाठी मार्गदर्शक आहे.

या कार्यक्रमाला श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेतील कोल्हापूर इचलकरंजी,सातारा महाविद्यालयातील प्राचार्य, प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

'माणूस समाजाचं काही देणं लागतो' या भावनेने पूरग्रस्त भागात मदत करण्याचे आवाहन प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांनी महाविद्यालयातील सहकारी प्राध्यापकांना व विद्यार्थ्यांना केले होते त्याला चांगला प्रतिसाद मिळाला. महाविद्यालयात जमा झालेली भरघोस मदत कार्यक्रम अधिकारी डॉ.तातोबा बदामे, डॉ.नितीन गायकवाड, डॉ.दत्ता गुंजाळ ,सचिन कदम यांनी दत्तक आर.वाय. पी.कला महाविद्यालय विहामांडवा येथे पोहोचवली व महाविद्यालयांशी ऋणानुबंध कायम ठेवले.

## विटा नगराध्यक्षसाठी ३, नगरसेवकसाठी ६९ जण रिंगणात

**विटा : हॅलो प्रभात**

विटा नगरपरिषद निवडणुकीसाठी अर्ज माघारी घेण्याच्या शेवटच्या दिवशी तीन नगराध्यक्ष व ६२ नगरसेवक पदाच्या उमेदवारांनी अर्ज माघारी घेतले. त्यामुळे आता नगराध्यक्षपदाच्या एका जागेसाठी काजल म्हेत्रे (शिवसेना शिंदे गट), प्रतिभा चोथे (भाजप) व रोहिणी जंगम (राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट) हे तीन, तर नगरसेवकपदाच्या २६ जागांसाठी ६९ उमेदवार निवडणूक रिंगणात राहिले आहेत.नगराध्यक्षपदासाठी शिवसेना, भाजप





व राष्ट्रवादी अशी तिरंगी लढत होणार आहे.

नगराध्यक्षपदासाठी १४, तर नगरसेवकपदासाठी २३० असे एकूण २४४ उमेदवारी अर्ज दाखल झाले होते. यांपैकी एकूण १०७ अर्ज छाननीत अवैध ठरले, तर १३७ अर्ज वैध ठरले.

नगराध्यक्षपदासाठी दाखल १४ पैकी आठ अर्ज अवैध ठरले होते. उर्वरित सहाजण नगराध्यक्षपदासाठी राहिले होते, तर नगरसेवकपदासाठी दाखल २३० पैकी १३१ अर्ज राहिले होते. नगरसेवकपदाचे तब्बल ९९ अर्ज अवैध ठरल्याने बाद झाले होते.





## हुपरीत होणार पंचरंगी लढत

**हुपरी : हॅलो प्रभात**

हुपरी नगर परिषदेच्या निवडणुकीमध्ये अर्ज माघारी घेण्याचा शेवटच्या दिवशी नगराध्यक्ष पदाचे २ तर नगरसेवक पदासाठीचे ३ अर्ज मागे घेतल्याने आता निवडणुकीसाठी राजकीय प्रचार यंत्रणेचे चित्र स्पष्ट झाले आहे. नगराध्यक्ष पदासाठी ६ आणि २१ नगरसेवक पदासाठी ९२ उमेदवार आत्ता आपले भवितव्य आजमावेत आहेत. हुपरी शहरांमध्ये पंचरंगी लढत होणार हे चित्र स्पष्ट झालेले असून राजकीय पक्षाने आपापल्या उमेदवाराच्या मागे आपली ताकद लावून उमेदवार निवडून येण्यासाठी प्रचार यंत्रणा सज्ज केली आहे.

भाजप शिवसेना (शिंदे गट) जनसुराज्य आणि आरपीआय (आठवले गट) यांनी आपली आघाडी स्थापन करून आपले उमेदवार रिंगणामध्ये उतरवले आहेत. तसेच मनसे, राष्ट्रवादी( शरद पवार गट),स्वाभिमानी शेतकरी संघटना, यांनीही आपले उमेदवार प्रत्येक भागामध्ये उभे केले आहेत. तसेच शिवसेना (उबाठा) यांनी सर्वच प्रभागांमध्ये आपले २१ उमेदवार उभे केले आहेत. राष्ट्रवादी (अजित पवार गटाने) निवडक भागामध्ये आपले उमेदवार देऊन आपले पूर्ण ताकत लावण्याचा प्रयत्न केला आहे. उमेदवारासाठी तयार असलेले पण पक्षाने त्यांना नाराज करून बाजूला टाकले असताना देखील अपक्ष म्हणून आपली जागा त्यांनी स्थापित करून निवडणुकीमध्ये आपला अर्ज भरून रिंगणामध्ये तेही सज्ज झाले आहेत.

निवडणूक प्रचार यंत्रणा चालू असतानाच मतदान जसे जवळ येईल तसे मतदारांच्या मध्ये देखील आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण दिसून येत आहे. आता या पंचवार्षिक निवडणुकीकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

# नागरी विकास आघाडी मनपा निवडणूक लढविणार

**सांगली : हॅलो प्रभात**

भ्रष्टाचारमुक्त आणि नियोजनबद्ध कारभार या मुख्य मुद्द्यांवर सांगली, मिरज, कुपवाड महापालिकेची निवडणूक ताकदीने लढवण्याचा निर्धार नागरिक विकास आघाडीच्या बैठकीत करण्यात आला, तर सांगली शहरातील बदाम चौकात दि. २७ नोव्हेंबरला पहिली सभा घेण्याचा निर्णय घेण्यात

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते वि. दु. बर्वे अध्यक्षस्थानी होते, यावेळी अजित सूर्यवंशी म्हणाले, महापालिकेमध्ये आजपर्यंत भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादी अशा सगळ्या पक्षांनी सत्ता राबवली आहे. परंतु भ्रष्टाचार, बेफिकिरी आणि नियोजनशून्य कारभार यामुळे या सगळ्यांनी सांगली, मिरज आणि कुपवाडचे वाटोळे केले आहे. त्यामुळे या निवडणुकीत नागरिक विकास आघाडीतर्फे मैदानात उतरण्याचा निर्णय नागरिकांनीच घेतला आहे. नागरिकांच्या तन-मन-धन अशा पाठबळावरच आम्ही ही निवडणूक लढवणार आहोत.

ॲड. अजित सूर्यवंशी पुढे म्हणाले, आघाडीतर्फे नागरिकांचा जाहीरनामा प्रसिद्ध केला जाईल. सर्वच राजकीय पक्षात उमेदवारीवरून एवढा गोंधळ आहे की निवडणुकीत नागरी प्रश्नाकडे लक्ष द्यायला कुणालाच सवड नाही.

या आघाडीमध्ये अनेक छोट्या-मोठ्या राजकीय पक्षांचे कार्यकर्ते त्यांच्या त्यांच्या चिन्हावर निवडणूक लढवण्यासाठी सहभागी होतील, तसेच काही अराजकीय भूमिका असलेले कार्यकर्तेही सहभागी होतील,

यावेळी प्रा. वाच्यसाहेब मासूले यांनी नागरिकांच्या जाहीरनाम्याचा मसुदा बैठकीत सादर केला. यावेळी युवराज शिंदे, संजेंराव पाटील, आयुव पटेल, जयपाल चौगुले, प्रेमचंद पांड्याजी, नितीन मिरजकर, प्रा. एस. के पाटील, प्रभाकर पाटील, रानाकर गोंधळी, लहरीदास कांबळे आदी उपस्थित होते.

## कोंडाबाई साळुंखे हायस्कूलचे दांडपट्टा स्पर्धेत यश



**हरिपूर : हॅलो प्रभात**

येथील श्रीमती कोंडाबाई कुंडलिक साळुंखे हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी जिल्हा क्रीडा युवा सेवा संचलन महाराष्ट्र राज्य पुणे द्वारा आयोजित, जिल्हास्तरीय स्पर्धेत आष्टे डू आखाडा - क्रीडा संकुल मिरज येथे संपन्न झालेल्या दांडपट्टा या स्पर्धेत खेळाडूंनी घवघवीत यश मिळविले.

सर्व विजेत्या खेळाडूंचं अभिनंदन शाळेचे मुख्याध्यापक दिलीप पवार व संस्थेचे संचालक राजकुमार हेरले यांनी केले. या खेळाडूंना मार्गदर्शन क्रीडा शिक्षिका सौ.पूजा पाटील आणि वैभव शिंदे यांनी केले. या सर्व खेळाडूंचे कौतुक सर्वत्र होत आहे.



## चिंचणीतील जि.प.शाळेत इंग्लिश लॅबचे उद्घाटन

**देवराष्ट्रे : संदेश जाधव**

कडेगाव तालुक्यातील चिंचणी (अं.) येथील जि. प. प्राथमिक शाळेत दि.१९ नोव्हेंबर रोजी अत्याधुनिक आणि आकर्षक इंग्लिश लॅबचे भव्य उद्घाटन करण्यात आले.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षणपद्धतीची जोड मिळावी, त्यांचा इंग्रजी शब्दसंग्रह आणि संवादकौशल्य अधिक प्रभावी व्हावं, या उद्देशाने ही लॅब उभारण्यात आली आहे. मुलांच्या दैनंदिन जीवनाशी जोडलेले अनेक विषय अतिशय सुंदर पद्धतीने साकारले आहेत. लॅबमध्ये ठेवलेल्या प्रत्यक्ष वस्तू, मॉडेल्स, रंगीबेरंगी चार्ट्स आणि लींर्ळींळीू-लरीशव श्रशरीपळपस मुळे मुलांना पाहून-स्पर्श करून-खेळून शिकण्याचा अनोखा अनुभव मिळणार आहे.

यावेळी चिंचणी केंद्रप्रमुख गोपाळराव होणमाने यांनी शाळेच्या उपक्रमाचे कौतुक करताना सांगितले की,इंग्लिश लॅब हा ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी एक महत्त्वाचा टप्पा आहे. मुलांमध्ये इंग्रजीबद्दलची भीती दूर करून आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी ही लॅब उपयुक्त ठरेल. तसेच शाळेने केलेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांची उच्चारशुद्धता, शब्दसंग्रह, निरीक्षणशक्ती, सर्जनशीलता आणि संभाषण कौशल्य लक्षणीयरीत्या वाढेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. या कार्यक्रमाला उपसरपंच दत्तात्रय माने,शाळेचे मुख्याध्यापक उत्तम मदने, शिक्षकवृंद, ग्राम पंचायत सदस्य ,ग्रामस्थ, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे औचित्य साधून शालेय व्यवस्थापन समितीचे माजी अध्यक्ष सचिन हिंदुराव माने यांनी विद्यार्थ्यांना गोड जेवणाची मेजवानी देत अत्यंत सुंदर असा कार्यक्रम पार पडला.

# ईश्वरपुरातील महायुती म्हणजे मुकादमांची एकत्र आलेली टोळी

### गणेश शेवाळे

**बळीराजा शेतकरी संघटनेचा आंनदराव मलगुंडे यांना पाठिंबा**

**ईश्वरपुर : हॅलो प्रभात**

उरूण ईश्वरपूरातील महायुती म्हणजे अनेक मुकादमांची एकत्र आलेली टोळी आहे. त्यांच्याकडून शहराचा विकास होणार नाही. मागील ९ वर्षात देखील यांच्या कडुन कोणत्याही प्रकारचे काम झाले नाही. असे मत बळीराजा शेतकरी संघटनेचे युवा अध्यक्ष गणेश शेवाळे यांनी व्यक्त केले. राष्ट्रवादी काँग्रेस



पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या नगराध्यक्ष व नगरसेवक पदाच्या उमेदवारांना पाठिंबा देताना ते बोलत होते.

यावेळी शेवाळे पुढे म्हणाले, वेगवेगळ्या दिशेला तोंड असणाऱ्या भिन्न विचारांचे लोक एकत्र येऊन उरुण ईश्वरपुर शहरात आघाडी बनली आहे.

उमेदवारी वाटपावर त्यांचे माघारीच्या दिवशी देखील एकमत होत न्हवते. त्यांच्या कडुन अपेक्षा व्यक्त करणे चुकीचे ठरेल.

आ. जयंतराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार एकसंधपणे विकासाच्या विचारावर लढत आहे. म्हणुन आम्ही वैचारिक दृष्टीने त्यांना पाठिंबा देत आहे.

यावेळी उरूण ईश्वरपूर शहर अध्यक्ष शहाजी पाटील, नगराध्यक्ष पदाचे उमेदवार आनंदराव मलगुंडे, शंकर चव्हाण, संग्राम पाटील निवास पाटील, दिग्विजय पाटील, निवास गायकवाड, अशोक सलगर, राजु पाटील आदी उपस्थित होते.

# राजारामबापू कारखान्यात १ लाख १०१ व्या साखर पोत्याचे पूजन

**ईश्वरपूर : हॅलो प्रभात**

राजारामबापू पाटील सहकारी साखर कारखान्याच्या साखराळे युनिटमध्ये उत्पादित १ लाख १०१ व्या साखर पोत्याचे पूजन राजारामबापू समूहाचे मार्गदर्शक,माजी मंत्री आ.जयंतराव पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी राजारामबापू साखर कारखान्याचे अध्यक्ष प्रतिकदादा पाटील, उपाध्यक्ष विजयराव पाटील,माजी जि.प. अध्यक्ष देवराज पाटील,शेती समितीचे अध्यक्ष विठ्ठल पाटील,बांधकाम समितीचे अध्यक्ष कार्तिक पाटील,जलसिंचन समितीचे



अध्यक्ष प्रदीपकुमार पाटील प्रामुख्याने उपस्थित होते. प्रारंभी जेष्ठ संचालक बाळासाहेब पवार यांच्या हस्ते विधिवत पूजन करण्यात आले.

आ.जयंतराव पाटील म्हणाले,गेल्या वर्षीच्या तुलनेत हा गळीत हंगाम लवकर सुरू झाला असून पूर्ण क्षमतेने गाळप सुरू आहे. आपण सर्वांनी ऊस तोडणी कार्यक्रमाच्या बाबत कायम दक्ष रहायला हवे. आपण वाफ बचत प्रकल्प हाती घेत असून तो पुढील हंगामच्यापुर्वी पूर्ण करू.

उपाध्यक्ष विजयराव पाटील म्हणाले, ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी आपला नोंदविलेला सर्व ऊस आपल्या कारखान्यास देऊन सहकार्य करावे.

आर.डी.माहुली म्हणाले,आपण १७ दिवसात १ लाखाच्यावर साखर पोत्यांचे उत्पादन केले आहे. या गळीत हंगामात १२० दिवसात ८ लाखाच्यावर गाळप करून १२.७५ टक्क्यावर साखर उतारा राखण्याचा आमचा प्रयत्न आहे.

यावेळी प्रदीपकुमार पाटील, रघुनाथ जाधव,प्रताप पाटील,राजकुमार कांबळे, रामराव पाटील, डॉ.योजना शिंदे-पाटील, दिलीपराव देसाई,माजी संचालक माणिकराव पाटील,कृष्णेचे संचालक अविनाश खरात, पै.विकास पाटील,ए.पी.पाटील यांच्या हस्ते ही साखर पोत्याचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी सर्व संचालक, सचिव,जनरल मॅनेंजर,चिफ केमिस्ट,शेती अधिकारी यांच्यासह ऊस उत्पादक सभासद,अधिकारी-कामगार उपस्थित होते. प्रारंभी शेती समितीचे अध्यक्ष विठ्ठल पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. बांधकाम समितीचे अध्यक्ष कार्तिक पाटील यांनी आभार मानले. आयएसओ विभागाचे निलेश साठे यांनी सूत्रसंचालन केले.